खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## मराठी विभाग : वाचनवाटा उपक्रम

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
Gramin _23 Oct 2024_016
23 Oct 2024
www.dainikprabhat.com

### वाचन म्हणजे जगण्याचा रियाज

#### ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात 'वाचनवाटा' उपक्रम

**राजगुरूनगर, दि. २२ (प्रतिनिधी)** - जगण्याच्या प्रश्नांची उत्तरे म्हणजे वाचनालये असून वाचन म्हणजे जगण्याचा रियाज असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित वाचनवाटा उपक्रमांतर्गत दिवाळी अंक वाटप कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. रौनक भिसे उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की, माणसा-माणसातले आणि माणुसकीतील अंतर दिवसेंदिवस वाढत चालले असून माणुसकीचा धर्म जागवण्यासाठी वाचन संस्कृतीची जोपासना करणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठी विभागाने राबविलेला वाचनवाटा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल त्यांनी समस्त मराठी भाषिकांचे अभिनंदन केले.

प्रास्ताविकात मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी वाचन संस्कृतीच्या प्रचारासाठी वाचनवाटा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रातिनिधिक स्वरूपात १०० विद्यार्थ्यांना दिवाळी अंकाचे वाटप करण्यात आले.

वर्षभरात सर्वात जास्त पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्याला वाचकवीर पुरस्कार देण्यात येणार असल्याचे सांगितले. निकिता राठोड हिने प्रार्थना सादर केली. सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी तर प्रा. रौनक भिसे यांनी आभार मानले.



**राजगुरूनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित वाचनवाटा उपक्रमा अंतर्गत दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले.**

> वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी विचारांची, पुस्तकांची देवाणघेवाण आवश्यक आहे. ज्ञान हे ग्रंथांच्या अभ्यासाने आणि वाचनानेच मिळू शकते. त्यासाठी वाचनवाटा उपक्रम स्तुत्य आहे.
>
> – डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य

सकाळ

# राजगुरू महाविद्यालयात 'वाचनवाटा' उपक्रम

**राजगुरुनगर, ता. २३ :** "जगण्याच्या प्रश्नांची उत्तरे म्हणजे वाचनालये असून वाचन म्हणजे जगण्याचा रियाज आहे," असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने आयोजित 'वाचनवाटा' उपक्रमांतर्गत दिवाळी अंक वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे आदी उपस्थित होते.

"वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी विचारांची, पुस्तकांची देवाणघेवाण आवश्यक असल्याचे सांगून ज्ञान हे ग्रंथांच्या अभ्यासाने आणि वाचनानेच मिळू शकते," असे प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी सांगितले.

प्रास्ताविकात मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी वाचन संस्कृतीच्या प्रचारासाठी वाचनवाटा उपक्रमाचे आयोजन केले असून प्रातिनिधिक स्वरूपात १०० विद्यार्थ्यांना दिवाळी अंकाचे वाटप केल्याची माहिती दिली. वर्षभरात सर्वात जास्त पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्याला वाचकवीर पुरस्कार देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. बी. डी. अनुसे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रौनक भिसे यांनी आभार मानले.



**राजगुरुनगर (ता. खेड) :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मराठी विभागामार्फत विद्यार्थ्यांना दिवाळी अंकाचे वाटप करताना उपस्थित मान्यवर.

Pune, District-Today
24/10/2024 Page No. 4

# राष्ट्रसंचार



## राजगुरू महाविद्यालयात दिवाळीअंक वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : जगण्याच्या प्रश्नांची उत्तरे म्हणजे वाचनालये असून वाचन म्हणजे जगण्याचा रियाज असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित वाचनवाटा उपक्रमांतर्गत दिवाळी अंक वाटप कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. रौनक भिसे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. पिंगळे यांनी वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी विचारांची, पुस्तकांची देवाणघवाण आवश्यक असल्याचे सांगून ज्ञान हे ग्रंथांच्या अभ्यासाने आणि वाचनानेच मिळू शकते असे सांगितले. त्यासाठी वाचनवाटा उपक्रम स्तुत्य असल्याचे ते म्हणाले. कु. निकिता राठोड हिने प्रार्थना सादर केली. प्रास्ताविकात मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी वाचन संस्कृतीच्या प्रचारासाठी वाचनवाटा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रातिनिधिक स्वरूपात १०० विद्यार्थ्यांना दिवाळी अंकाचे वाटप करण्यात आले. वर्षभरात सर्वात जास्त पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्याला वाचकवीर पुरस्कार देण्यात येणार असल्याचे सांगितले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख